# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(आस्थापना शाखा)

जाहिरात क्र./516/ज.स./२०२५ | दिनांक २८/०८/२०२५

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेत सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत, स्थापन करण्यात येणाऱ्या Urban Design Cell संचालन कक्षा अंतर्गत शहरातील प्रमुख रस्त्याकरिता Walkable Street Concept राबविण्याकरिता आवश्यक कृती आराखडा तयार करणे. प्रकल्प विभागाला अर्बन रस्त्याचे डिझाईन तयार करुन देणे इत्यादी करिता अर्बन स्ट्रीट डीझाईन सेल तयार करण्याच्या दृष्टीने खालील पदावर कंत्राटी तत्वावरअनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथमतः ६ महिन्यांच्या कालावधीकरिता नियुक्ती करावयाची आहे.

उपरोक्त कामाचा अनुभव असलेल्या इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखती करिता आवश्यक कागदपत्रांसह दिनांक ०३/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता अति. आयुक्त (शहर), सिव्हील लाईन्स, महानगरपालिका, नागपूर येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा | पात्रता व अनुभव | मानधान प्रति माह |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Senior Urban Designer | M.Tech in Urban Planning or Master in Planning | 38 | 5 Years & Above relevant experience in urban designing /Street designing /Public space designing ete | रु.50,000/- |
| 2 | Junior Urban Designer | M.Tech in Urban Planning or Master in Planning | 38 | 3 Years & Above relevant experience in urban designing /Street designing /Public space designing etc. | रु.40,000/- |

वरील पदाकरीता इच्छुक उमेदावारांनी दि03/09/२०२५ रोजी सकाळी १०:३० ते १२:०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. पात्र अर्जदाराची मुलाखत त्याच दिवशी लगेच घेण्यात येईल.

अर्हता:-

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पद्धतीने असेल.
३. या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
४. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रपत्रात भरून थेट सादर करावेत. इतर प्रपत्रात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

५. शासन निर्णय दि. ९ फेब्रुवारी, २०१८ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पद्धती निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकीच्या अटी-शर्तीबाबत तसेच सदर नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत नमुद असल्याने उक्त पदावरील नियुक्ती ही निवड कंत्राटी स्वरूपाची असून, पुढे नियमित करण्यात येणार नाही.

६. वयोमर्यादा विचारात घेतांना दि.   /   /२०२५ ही तारीख ग्राह्य धरण्यात येईल.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत व्यय पद क्र. A२२००१३१०००१ मधून राहील.

८. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसांक्षाकित करुन जोडाव्यात.

९. उमेदवारांनी अर्ज सादर करुन अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

१०. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

११. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

१२. उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सुचना देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. मुलाखती अंती प्राप्त गुणानुसार गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येवून त्यानुसार आदेश निर्गमित करण्यात येईल.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता / अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

**(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)**

**वसुमना पंत (भा.प्र.से)**
**अति.आयुक्त (शहर)**
**महानगरपालिका, नागपूर**

**दिनांक :-** /०८/२०२५

# अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ..................................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ..................................................................................

३. पूर्ण पत्ता :- ..................................................................................

..................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ..................................................................................

ई-मेल आय डी :- ..................................................................................

४. जन्म दिनांक :- ..................................................................................

५. दि /०८/२०२५ ला वय :- ..................................................................................

६. शैक्षणिक पात्रता :- ..................................................................................

| उत्तीर्ण परीक्षा | विद्यापीठ | श्रेणी | टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

७. अनुभव :- ..................................................................................

| अ. क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | कर्तव्य व जबाबदारी | कालावधी | उल्लेखनीय कामगीरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

स्वाक्षरी